# यंग ब्रिगेड



### 'कमला...'ची संकल्पना

## 'एक विद्यार्थिनी...एक पुस्तक!!'



**कोल्हापूर :** ग्रंथ प्रदर्शनास भेटीप्रसंगी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, सौ. उर्मिला कदम, अलोक जोशी, प्रा. आनंद साळोखे आदी. (छाया : कृष्णात निगडे)

विद्यार्थिनींना पुस्तकांची गोडी लागावी....अभ्यासक्रमाबरोबरच अवांतर वाचनाची सवय जडावी... साहित्याच्या सहवासात त्यांनी ज्ञानाचे कण वेचावेत असा उद्देश ठेवून येथील कमला कॉलेजतर्फे गेल्या पाच वर्षापासून महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन भरविला जातो. 'एक विद्यार्थिनी...एक पुस्तक !!' ही ग्रंथ प्रदर्शनामागील मुख्य संकल्पना. यंदाही गेल्या आठवड्यात 'कमला कॉलेज'मध्ये ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आलं होतं. महाविद्यायलाचे प्राचार्य डॉ.क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भरविण्यात आलेल्या या दोन दिवशीय प्रदर्शनाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, खरेदी केलेल्या प्रत्येक पुस्तकावर पंधरा टक्के सवलत होती. अक्षर दालनच्या सहकार्याने प्रदर्शन झालं.

एरव्ही बाजारपेठेत शंभर रूपयाहून अधिक किंमतीची पुस्तके विकत घेतली तरच डिस्काउंट दिला जातो. मात्र 'कमला कॉलेज'मधील ग्रंथालय समितीने अधिकाधिक विद्यार्थिनीनी पुस्तके खरेदी करावीत म्हणून प्रत्येक पुस्तकासाठी सवलत योजनेचा प्रस्ताव पुस्तक विक्रेत्यापुढे मांडला...आणि त्यानुसार सवलत दिली गेली. ग्रंथालय कमिटीचे प्रा.ए.एम. साळोखे, प्रा.जे.बी.पाटील,प्रा.बी.बी.शेळके, प्रा.एस. व्ही.बागल आणि ग्रंथपाल सौ.यु.आर.कदम यांनी प्रदर्शनाचे संयोजन केले.

कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनीनी प्रदर्शनाला भेट दिली. कुणी मराठी शब्दकोश खरेदी केला...कुणी इंग्रजी डिक्शनरी विकत घेतली. जीवनात यशस्वी कसं व्हावं, व्यक्तीमत्व विकासविषयक, स्पर्धा परीक्षा विषयक पुस्तकाला अधिक पसंती होती. थोरामोठ्यांचे चरित्र, कथा-कादंबऱ्या, कवितासंग्रह जवळून न्याहाळताना विद्यार्थिनी दोन दिवस साहित्य विश्वात हरवून गेल्या होत्या.